म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७४५
सन-१८५४

63
काव्य

ही कविता

# विष्णु परशुरामशास्त्री पंडित

यांनीं

स्वदेशसुधारणेसंबंधी

कीर्तनाच्या उपयोगार्थ

केली ती,

नं. ६३
63
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
लेखक वि. प. पंडित
सन १८५४
संग्रहालय क्रमांक ५४८ ७४५
पुस्तकाचें नांव पुष्पमाला

काव्य २२३

# पुष्पमाला.

ही कविता

विष्णुपरशुरामशास्त्री पंडित

यांनीं

स्वदेशसुधारणेसंबंधी

कीर्तनाच्या उपयोगार्थ

केली ती,

मुंबईंत

इंदुप्रकाश छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

शके १७९५.

सन १८७४.

किंमत ४ आणे.

( हा सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें नोंदला असे. )

ही

# पुष्पमाला

भरतवर्षस्थ स्वदेशहितेच्छु

देशबांधवांस

परमप्रीतीनें नजर केली आहे.

# सूचना.

स्वदेशसुधारणेकरितां अनेक उपयुक्त र व्याख्यानें देण्याचा प्रकार जसा चालू अ साच त्या विषयावर कीर्तनें करण्याचाही प्रकार सुरू केल्यास तो श्रोतृजनांस फार प्रिय होईल असे कितीएक विद्वान मित्रांचे उद्गार बहुत दिवसांपासून कानीं येतच होते व इतक्यांत सोलापुर मुक्कामीं तो प्रकार स्वदेशहितेच्छु वकील रा. रा. गणेश बावाजी माटे व त्यांचे मित्र यांनीं सुरू केला हें पाहून इकडेही सुरू करण्याचें मनांत आणलें; परंतु कीर्तनास कवनाची आवश्यकता आहे, आणि तो प्रयत्न तर नवीन, त्यास प्रतिभादिगुण सहज असले पाहिजेत ते अंगीं नाहींत ह्मणून स्वस्थ बसण्याचीच वेळ आली होती. परंतु ज्यांनीं कीर्तनाचें काम हातीं घेण्यास प्रोत्साहन दिलें त्यांनींच यथाशक्ति हा नवीन प्रयत्न करण्याविषयींही प्रोत्साहन दिल्यावरून कीर्तनापुरतींच कांहीं निरानिराळ्या वृत्तांचीं पद्यें सरासरी बांधलीं. पुढें तीं कीर्तनांत श्रुत झाल्यावर पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याविषयींही लोकांनीं इच्छा प्रदर्शित केल्यावरून हीं स्वदेशभक्तांस परमप्रीतीनें सादर केलीं आहेत. या ग्रंथास "पुष्पमाला" याच्याबद्दल "पलाशपुष्पमाला" हें नांव विशेष शोभेल हें हा माळी समजून आहे, तरी स्वदेश-

बांधवांविषयीं जो या माळ्यास प्रेमातिशय आहे त्या मुळेंच, श्रीकृष्णास सुदाम्याच्या पोह्यांप्रमाणें अथवा इंदूस गरीबाच्या सुताप्रमाणें ही त्यांस अर्पिली आहे, तिचा तेही सप्रेम स्वीकार करून ती कंठीं घालतील अशी आशा आहे.

या माळेमध्यें कांहीं मोतियासारखीं संस्कृत कुसुमें आढळतील तीं येथें जीवनबागेंत एक अद्भुत लाल आहे त्यानें दिलेलीं आहेत.

या माळेच्या अखेरीस ह्मणजे पृष्ठभागीं ज्या लडी लटकल्या आहेत त्या या माळ्याचे मित्र रा. रा. विनायक यशवंत बेरडे यांनीं तयार केलेल्या त्यांच्या इच्छेवरून या माळेस जोडल्या आहेत.

वि. प. शा. पं.

मुंबई, ता. २६ जानेवारी १८७४.

# ओम् तत्सत्.

यतो वाचो निवर्तंते
अप्राप्य मनसा सह ॥
आनंदं ब्रह्मणो विद्वान्
न बिभेति कदा च न ॥

अभंग २ चरणी.

शरण जावें परमानंदा ।
तोचि अंतीं नेई पदा ॥ ध्रु. ॥
जो या सृष्टीचा जनिता ।
तोचि अमुचा बुद्धिदाता ॥ १ ॥
जग मिथ्या भ्रांतितति ।
ऐसें कोणी वर्णितातिि ॥ २ ॥
परि नव्हे जग भ्रांति ।
आहे खरी ईशकृति ॥ ३ ॥

ब्रह्म सत्य जग मिथ्या ।
दावि विश्वनश्वरता ॥ ४ ॥
ईश जगाचा जनक ।
पालक आणि संहारक ॥ ५ ॥
हाचि श्रुतींचा सिद्धांत ।
पाहा शोधोनी वेदांत ॥ ६ ॥
जग जरी हें नश्वर ।
चाले तो इच्छी तोंवर ॥ ७ ॥
जगा सुखाची सामग्री ।
ईशें केली चराचरीं ॥ ८ ॥
म्हणुनि जग सुखी नित्य ।
असो ईशेच्छा ही सत्य ॥ ९ ॥
जनीं तैसेंचि वर्तावें ।
तेणें ईश तोष पावे ॥ १० ॥
सदुद्योगा साह्य देई ।
सदिच्छांतें सिद्धी नेई ॥ ११ ॥
मित्र ह्मणे हा विश्वास ।
धरुनि वेगीं घाला कास ॥ १२ ॥

 आला २२३

अभंग २ चरणी.

नाहीं कंठामाजी गोडी ।
नाहीं वक्तृत्वाची प्रौढी ॥ १ ॥
येथें उद्देश प्रधान ।
त्याशि द्यावा सकळीं मान ॥ध्रु.॥
नाहीं तालस्वरज्ञान ।
नाहीं गायन साधन ॥ २ ॥
नाहीं कवनामाजी छंद ।
नाहीं प्रतिभेचा ही गंध ॥ ३ ॥
नाहीं काव्याचा अभ्यास ।
तरी न व्हावें उदास ॥ ४ ॥
मित्र विनवी जेवीं भृंग ।
व्हावें मकरंदीं दंग ॥ ५ ॥

पद.

( भोलानाथ० )

बुधहो, सत्वर सावध होऊनि ।
चित्त विनंतीस द्या ॥ ध्रु. ॥
देशस्थिति अति दुःखद झाली
नाहीं शक्ति वदाया ॥ बुधहो ॥ १

आर्यावर्ती स्वामि असुनि अह्मी
आलों आजि थरा या॥ बुधहो० २
वसनान्नाविण लोटिति जन दिन
कांहिं धरा मनिं माया॥ बुधहो ३
संकट मोठें दुर्धर आलें
योजा योग्यउपाया ॥ बुधहो॥ ४
दास विनवि हा कर जोडुनियां
राख अह्मां प्रभु राया॥ बुधहो५

श्लोक.

आर्यावर्तास धातुक्षय बिकट महा
व्याधिनें ग्रासियेलें,
किंवा हा राजयक्ष्मा प्रतिदिनिं हरुनी
वीर्य या नाडियेलें ।
गेल्या शक्ती गळोनी पद हि न चलवे
फार आक्रंद केला,
तारा मातें मुलांनो ह्मणुनि रडुनियां
कोणि नेदी हकेला ॥ १ ॥

काव्य 63

साक्या.

चौदा विद्या चौसष्ट कळा
येथें जन्मा आल्या ।
कोमल वयिं अस्मज्जनकांनीं
अंकावरि धरियेल्या ॥ १ ॥
चोळुनि रगडुनि बहु प्रकारें
पायांवरि न्हाणील्या ।
त्यांचें लालन पालन करुनी
योग्य पदा आणील्या ॥ २ ॥
नानापरिच्या संस्कारांनीं
सर्व सुसंस्कृत केल्या ।
बहुविध दुर्धर प्रसंग येतां
प्राणांपरि रक्षील्या ॥ ३ ॥

कटाव.

पहा कैसा आलस्याचा ।
परिणाम दुस्तर झाला ।
व्यापार सर्व बुडाला ॥ ध्रु. ॥
देशिवस्तुंची पायमल्ली ।

इंग्राजि वस्तुंनिं अतिशय केली ।
नाहीं तिळभर जागा राहिली ।
चिंतेनें जनमनें व्यापिलीं ॥
कारागिरांचीं दारें झाकलीं ।
उपास लोकें काढुं लागलीं ।
पोरें बाळें नकोशिं झालीं ।
माणसें देशोधडी लागलीं ॥
कितिएक मेलीं कितिक वांचलीं ।
कितिएक भिक्षा मागुं लागलीं ।
दांतीं तृण धरुनियां बैसलीं ।
हाहाकारें भूमि व्यापिली ॥
धाय मोकलुनि रडूं लागलीं ।
कोण अह्मां तारील माउली ।
अह्मां नाहिं काय कोणिच वाली ।
हीच वैखरी भरोनि उरली ॥
क्षय द्रव्याचा ॥ पहा कैसा० ॥ १ ॥
धोत्रें उपरणीं पंचेजोड्या ।
कुडत्या जाकिटें सदरे बंड्या ।

बुतांव बिरडीं अंकडे गुंड्या ।
बत्त्या टोप्प्या फेटे पगड्या ॥
टेप फिती आणि दाल नाड्या ।
लुगडिं लहंगे चोळया साड्या ।
मेणबत्त्या अगिच्या काड्या ।
तंबाखूचे चिरूट वीड्या ॥
छड्या सोडगे काठ्या लकड्या ।
गलास झुंबरें झाडें हंड्या ।
शीघ्राम ब्रोहम फेटन गाड्या ।
मुशी आणि शेकाच्या शेगड्या ॥
पेट्या आणि खलबत्ते दगड्या ।
मापें वजनें कांटे दांड्या ।
या मालाच्या येउनि छकड्या ।
देशिवस्तुंच्या झाल्या चिंधड्या ॥
क्षय द्रव्याचा ॥ पहा कैसा० ॥ २ ॥
भरली विलायत घरिंदारीं ।
सुई टांचणी चाकु कातरी ।
टांक लेखणी लाख दोरी ।

शाई कागद वाळु बसोरी ॥
अरसा वस्त्रा चिमटा आणि सुरी ।
पायमोजे वर बूट गार्टरी ।
हतमोजे अंगरखे विजारी ।
रुमाल आणि गळबंद कूसरी ॥
खुर्चा मेजें वाचें परोपरी ।
पेले चमचे कांटे तगारी ।
गोळ्या चूर्णे रस पिचकारी ।
गौडी पैष्टी सुरा आसुरी ॥
सारंग्या आणि बाजे सतारी ।
तंबुर झेंगट शिंग तुतारी ।
बंदुक पिस्तुल आणि तलवारी ।
कुठवर वर्णावीं हीं सारीं ॥
क्षय द्रव्याचा ॥ पहा कैसा० ॥३॥

अभंग ४ चरणी.

आपल्या शक्तीचे तुह्मी अजाणते ।
करितां निजहातें निजनाश ॥ध्रु.॥
सिंहाचे जे पेटे श्वानांत वाढले ।

 काव्य २२३

जाती विसरले नीचसंगें ॥ १॥
तेंवि तुम्हां गति झाली दुर्दैवानें ।
ज्ञानप्रकाशानें पाहा नीट ॥२॥
आर्य राजे पूर्वी गेले देशांतरीं ।
संपत्ति भांडारीं सांठविली॥३॥
ज्ञानधन त्यांनीं मेळविलें फार ।
लौकिक अपार तेणें झाला॥४॥
मित्र म्हणे सांगूं कोठवरी आतां ।
इतिहास पहातां स्पष्ट कळे॥५॥

साक्या.

असे धुरंधर पूर्वज अमचे
परोपकारी तैसे ।
म्हणुनि आर्य हें नांव पावले
त्यांचे सुत अम्हि कैसे ॥ १ ॥
त्यांच्या ज्ञानधनाची कीर्ती
भूवर गरजत होती ।
अमच्या विद्या लोपुनि पसरलि
अज्ञानाची ख्याती ॥ २ ॥

सूर्यापोटीं शनैश्चरापरि
आर्यांपोटीं आह्मी ।
कलहप्रिय अन्योन्यविनाशक
नयों कुणाच्या कामीं ॥ ३ ॥
विद्या गेल्या कलाहि गेल्या
गेला लौकिक सारा ।
केवळ अन्नावस्त्रासाठीं
फिरतों दारोदारा ॥ ४ ॥
जिथ नवरत्नें चमकत होतीं
तेथें उरल्या गारा ।
यवनीं लुटिलें लुटती लुटतिल
जरि न कराल विचारा ॥ ८ ॥

---

अभंग २ चरणी.

देश माता देश पिता ।
त्याची पुत्रीं वहावी चिंता ॥ ध्रु. ॥
पुत्रां काय समाधान ।
जनक दुःखें जरि हैराण ॥ १ ॥
जनक दुःखी पुत्रासाटीं ।

 काव्य २२३

पुत्र जाणुनि लाथे लोटी ॥ २ ॥
यांत काय थोरपण ।
जळो जीण लाजिर्वाण ॥ ३ ॥
ह्मणुनि मित्र सावध करी ।
त्वरित यावें शुद्धीवरी ॥ ४ ॥

पद.

( यमनकल्याण. )

ज्ञानाचा महिमा किति वाणूं ।
बुध हो ॥ ध्रु. ॥
निबिडांधारीं श्रांतजनां प्रभा ।
होउनि दे विश्रामा ॥ १ ॥
तापत्रयानें तप्त मनाला ।
निववुनि दे आरामा ॥ २ ॥
चोर न लूटती बंधु न मागती ।
देतां त्या नच सीमा ॥ ३ ॥
भूप न तें हरी भार नसे शिरीं ।
सोडि न तें निजधामा ॥ ४ ॥
सौख्योत्पादक दुःखविनाशक ।

साधन सर्व सकामा ॥
ऐसें ज्ञान हें द्या निजबांधवां ।
ठेवुनि त्यांवर प्रेमा ॥ ५ ॥

आर्या.

जें निर्मल ज्ञानामृत
प्रेमें पीतील सर्व आर्यजन ।
तेव्हांच युरपखंडीं
सर्वत्रहि पावतील ते वजन॥१॥

साक्या.

मातेपरि रक्षिते पित्यापरि
सत्कार्यीं योजी ते ।
कांतेपरि ती खेद निवारुनि
चित्ताला रमवीते ॥ १ ॥
देउनि वैभव दिगंतरीं ती
कीर्ती पसरि अपार ।
सर्व चि हेतू साधी विद्या
असो सान वा थोर ॥ २ ॥

अभंग ४ चरणी.

सृष्टि स्थिति लया ज्ञानचि कारण ।
ज्ञानचि तारण जीवांलागीं॥ ध्रु.॥
जें जें वस्तुजात हो का चराचर ।
त्या सर्वां आधार ज्ञानाचाचि॥ १॥
जें कां ज्ञानाविण घडे ऐसें कांहीं ।
विश्वामाजी नाहीं निश्चयेंसी ॥ २
चारी पुरुषार्थ ज्ञानाच्या अधीन ।
ज्ञानसंपादन याच साठीं ॥ ३ ॥
म्हणून ज्ञानियांनीं अज्ञानियां ज्ञान ।
द्यावें पाचारून स्वगृहाशी ॥४॥
हीच या मित्राची प्रार्थना आपणां।
प्रेमें ध्यानीं आणा सज्जन हो॥ ५

आ.र्या.

दानें अमित असति परि
विद्यांचें दान श्रेष्ठ गणितात ।
दात्यास वृद्धि तत्क्षणिं
प्रतिग्रहीत्या सुजन्म देतात॥ १॥

केका.

न मागत असेंचि मा
अजि तुम्हांपुढें येउनी,
दिल्या बहुत याचका
जरि तुम्हांस ती ये उणी।
असेंच तुम्हि द्या कि जें
किति दिल्याहि नोव्हे कमी,
अशी जगातिं वस्तु ही
बघुनि याचितों एक मी ॥ १ ॥
अशी दिसतसे अहा
जरि म्हणाल देतों असें,
वदेन मज येरवीं
श्रम वृथा कशाला तसे।
बरें तर तुम्ही अतां
निजजनांस विद्याच द्या,
हरी सकल दुःख जी
अणिक दे सुखाच्या नद्या॥२॥

श्लोक.

विद्येचें फल वाद वित्तफलही
उन्मत्तता हें दिसे
शक्तीचें फल पीडणेंच दुसऱ्या
ऐसें खलाचें असे ।
विद्या वित्त परां सुबोध करणीं
दानीं तसें योजितो
शक्ती योजुनि रक्षितोचि इतरा
साधू असा वर्ततो ॥ १ ॥

अभंग २ चरणी.

स्वदेशाची करूं सेवा ।
हाचि दृढ निश्चय ठेवा ॥ ध्रु. ॥
तरिच नरें जन्मा यावें ।
हित देशाचें साधावें ॥ १ ॥
पोटें सर्व भरताती ।
श्वानसूकरादी जाती ॥ २ ॥
भक्ष निद्रा भय गमन ।
हीं तर पशूंशीं समान ॥ ३ ॥

मनुष्याचें श्रेष्ठपण ।
ज्ञानसामग्रीसाधन ॥ ४ ॥
ज्ञान घेतां देतां मुक्ति ।
ऐशीं शास्त्रें गर्जताती ॥ ५ ॥
ह्मणुनि ज्ञान घ्यावें द्यावें ।
स्वबांधवां सुखवावें ॥ ६ ॥
ऐसें मित्र जोडुनि हात ।
विनवी त्यास द्यावें चित्त ॥७॥

श्लोक.

आर्यावर्तीं कसा हा अनयनय घडे
श्वान सिंहीस पीती
सिंहीच्या शावकांशीं अशननच मिळे
फार ही चित्र रीती ।
होवोनी मत्त मोठे मग शुनक अति
त्रास देती हरींशीं
जे झाले दीन अन्नाविण ह्मणुनि हळू
आश्रिती ते दरींशी ॥ १ ॥

आर्या.

आर्यान्वयरत्नाकरिं
सर्वचि कैसे वराट उद्भवले ।
त्याप्रति वराटिकाकर
ह्मणणें यास्तव ललाटिं कीं आलें १
परदेशिंच्या जनांला
कीं आह्मां निर्मिलेंच तुडवाया ।
झालों जडपाषाणचि
निजपूर्वजकीर्तिनाव बुडवाया ॥ २ ॥
नरजन्मा येउनियां
सार्थक करितां कसें स्वदेहाचें ।
बोला प्रसंग गेल्या
मग उत्तर काय द्याल ये वाचे ॥३॥

साक्या.

अर्थसुखयशें नसुनि अनर्थहि
असले तरी सुधीर ।
प्रतिज्ञात सत्कर्मे करिती
न भिती उदार वीर ॥ १ ॥

उपकारिजनीं उपकृतिकर्ते
जागिं सत्पुरुष अनेक ।
परि स्वार्थाविण उपकृतिव्यसनी
किति आढळतिल लोक ॥ २ ॥
स्वोदरभरणव्यापारनिरत
असति हजरो लोक ।
परोपकृति जो स्वार्थचि मानी
तोचि एक सुश्लोक ॥ ३ ॥

श्लोक.

ज्यांनीं देशहितार्थ भोग त्यजुनी
कार्यें बहू साधिलीं
ज्यांनीं ज्ञानधनें स्वबांधवजनां
रक्षावया वेचिलीं ।
ज्यांनीं युक्ति अनेक योजुनि
जगत्कल्याण आरंभिलें
ते झाले जागिं धन्य अन्य मनुजीं
माते वृथा क[illegible]टिलें ॥ १ ॥

आर्या.

श्वानाच्या पुच्छापरि
विद्येवांचूनि व्यर्थ जीवन हें ।
गुह्यास तें न झांकी
नच वारी दंश ह्मणुनियां न सहे ॥

श्लोक.

जन्मला असें त्या नरा म्हणा
ज्यामुळें कुला ये भलेपणा ।
कीटकादि कां नाहिं जन्मलीं
खातरें तिहीं सर्व व्यापिलीं॥१॥

---

अभंग २ चरणी

बारा वर्षें विद्याभ्यास ।
करुनि पाहतां व्हाया दास॥धृ.॥
मिळतां लहान चाकरी ।
मिरवितां प्रौढी थोरी ॥ १ ॥
तो चि परमार्थ मानितां ।
मुख्य कार्य विसरतां ॥ २ ॥
ह्मणतां आह्मी मोठे धन्य ।
आह्मांसरिसे थोडे अन्य ॥ ३ ॥

काय यांत गौरव आहे ।
खर जैसा गोणी वाहे ॥ ४ ॥
स्वातंत्र्याचा करा धंदा ।
स्वदेशाचें हित साधा ॥ ५ ॥
मित्र ह्मणे हें भूषण ।
येर नरजन्मा दूषण ॥ ६ ॥

पद.

( धनाश्री—कृष्णगडी० )

ऐसा महिमा एकीचा ।
आणा बुध हो मनिं साचा॥ध्रु.॥
अल्पहि वस्तू जमतां फार ।
होती महतां त्या आनिवार ॥
तंतू होतां एकवट ।
बांधिति सिंहाही घट्ट ॥
मिळतां पिपीलिका बहुत ।
मारिती सर्पाही त्वरित॥ ऐ०॥१
घोडा माणुस आणि हत्यार ।
जमतां होतो दुर्जय स्वार ॥

अग्नि कोळसा गंधक खार ।
निराळे असतां ते अविकार ॥
जमतां एके ठायीं चार ।
करितिल सृष्टीचा संहार।ऐ०२
पंच महाभूतें मिळुन ।
केलें सृष्टीचें जनन ॥
अग्नी पाणि आणि धान्य ।
नव्हतां एक नव्हे अन्न ॥
हें तर समजति सर्व जन ।
याहुन स्पष्ट काय अन्य॥ऐ०॥३
एकीविणें नव्हे कांहीं ।
पहा अपुल्याच तुम्ही देहीं ॥
चोविस वीर एकवटती ।
कार्यें सर्वच तैं घटती ॥
कुठवर वर्णूं या गोष्टी ।
उमजा तुम्ही दूरदृष्टी॥ऐ०॥४॥

आर्या

आर्यावर्तांतर्गत

आर्यमताभिज्ञ एक हरदास ।
प्रार्थितसे अपणांप्रति
कीं झालोंजनाहितार्थ हरदास ॥१॥
न दिसे आह्मांमाजी
जितका देशाभिमान शुनकांत ।
ते अजुनि बघुनि हूणां
धावुनि सावेश करिति आक्रांत ॥२॥

श्लोक.

अहो बालाः काला-
 नलकवलिता लालनकरी
जनैरन्यैर्माता-
 भवदहह मा तावदधुना ।
धुनानैश्चारित्र्यं
 चिरतरपवित्रं किल बला-
त्परामृष्टा युष्म-
 द्विधसुतशते सत्यहमियम् ॥१॥

आर्या.

काय बहुत सुत एक हि

कामिं नये जरि वदे मही जननी ।
हे शब्द हृदयभेदक
शस्त्रापेक्षा नसे सुसुतहननीं ॥ १ ॥
यापरि भूमातेच्या
ऐकुनियां आर्य हो विलापरवा ।
वदतों सत्यचि जाणा
वित्ताची तिळ नसे मला परवा ॥२॥
बोला बांधव झडकरि
ऐकाया हात जोडुनी सिद्ध ।
शुश्रूषार्थ बहु ह्मणुन
प्रेमगुणें करितसें तुह्मां बद्ध ॥ ३ ॥

श्लोक.

सुमधुरपयसा य-
त्पोषिताः स्मः स्वगर्भे
चिरमपि विधृताः स्मो-
तिश्रमैर्लालिताः स्मः ।
जननि भरतभूमे
तत्कृताचारभूमा

प्रतिकृतिविषयोयं
दुःशकोस्माद्दृशानाम् ॥ १ ॥
नयवनकलिता त्वं
साधुताशालिनी या
सपदि यवनलोकैः
सा धुता दुर्विलोकैः ।
प्रकटविकटशोकं
स्पष्टमेनं विनेतुं
दिशदिश सुमतिं नो
रक्षितुं धर्मसेतुम् ॥ २ ॥

केका.

जिच्या उदरिं जन्म दे
स्तनिं तिच्याच दुग्धा करी,
प्रभू नियम हा असे
सम समस्त पृथ्वीवरी ।
करोनि तुलना अतां
जननिची पहा भूमिशीं,
घडेल जरि अन्यथा

नियम हा न ठेवूं मिशी ॥ १ ॥

जिथे जनि तिथे सदा
असति अन्नवस्त्रें तशीं,
जशी गरज ज्या जिवा
प्रभुस न्यूनता कायशी ।
परी यवन दुर्मति
उलट जाति नेमास या,
धरा ह्मणुनि आर्य त्यां
मति सुपंथ दावावया ॥ २ ॥

प्रसू असुनि एक ही
शिशु अनेक पोषी असें,
घडे न सहसा कधीं
जरि बळेंच आंगा डसे ।
तरी नमन शुद्ध ती
करुनि घालि पान्हा सती,
भिऊनि निजमानसीं
किं मम लेंकुरें नासती ॥ ३ ॥

आर्या.

जेथें संपद्वैभव
होतें तैसाच भर विलासाचा ।
तेथें महौघ यवनीं
दारिद्र्याचाच भरविला साचा ॥
ज्या मातेची पूर्व-
स्थिति अठवुनि अनुपमेय जगतींत ।
ह्रदय फुटे सदयांचें
काय विपद्‌ग्रस्त आर्यजग तींत॥

श्लोक

ही रत्नरूपिणि सदा वसुधा अ-
सोनी
केली अरत्न बुधहो बहुधा बसोनी ।
सांडोनि यत्न अवघे बसलां रु-
सोनी
घेतां किमर्थ अजि व्यर्थ जगीं हं-
सोनी ॥ १ ॥
कर्तव्य कर्म जितुकें वसतें मनांत

तें सर्व साधुनि सुखेंचि वसा जनांत।
नाहीं तरी बसुं चला अवघे वनांत
कीं सर्वथाहि न दिसे फल जीव-
नांत ॥ २ ॥

बहुत जमुनि कार्यें केलिया थोरथोर
न पडुनि प्रति एकीं मानवीं फार भार।
सहज घडति सारीं एकिचें बीज राहे
म्हणुनि फिरफिरोनी मित्र हा प्रार्थि-
ताहे ॥ ३ ॥

साकी.

वसुधा अंगण सागर ओढा
हिमगिरि वारुळ होती ।
उद्योगि नरा सर्वचि उलटीं
निरुद्योगिया हो तीं ॥ १ ॥

अभंग.

सदुद्योगा साह्य देई
सदिच्छांतें सिद्धी नेई ।
मित्र ह्मणे हा विश्वास

धरुनि वेगीं घाला कांस ॥ १ ॥

श्लोक

पूर्वीं कृतीं दुर्जय शंखनामा
आर्यां छळूनी करि जो हमामा ।
वेदां हरोनी सुदृढप्रतापें
ज्याच्या भयें हें जग सर्व तापे ॥१॥
त्याचा वधोपाय मनीं धरोनी
क्षीराब्धिवासा हृदयीं स्मरोनी ।
ते प्रार्थिती बा जगदेकराया
दे शक्ति आह्मां झगडा कराया ॥२॥
शंखासुरें नेउनि वेद सारे
निःसत्त्व केलें बघशी कसारे ।
आधार आह्मां तुजवीण नाहीं
हें बोलणें सत्यचि सर्व पाहीं ॥ ३ ॥
प्रार्थना मनिं धरीं अजि बापा
मारवीं असुर हा हरिं तापा ।
ऐकुनी वचन आर्यजनाचें
पाझरे मन दयासुघनाचें ॥ ४ ॥

देऊनि वेदां सकला जनातें
मनीं स्मरोनी पितृपुत्रनातें ।
संतुष्ट केलें सकला जगातें
गाती अशी कीर्ति पुराणगाते ॥ ५ ॥
हा मत्स्यरूपी अवतार जाणा
या सच्चरित्रास मनांत आणा ।
ऐशींच साधाल हितें जनाचीं
होईल शांती बुधहो मनाची ॥ ६ ॥
अस्तु प्रस्तुत ह्मण लोक बहुशा
व्यापारिरूपें खरे
आले मलकलादिवित्तनयना-
साठींच जाणा बरें ।
या वित्ता हरुनी भरोनि सुतरी
जाती स्वदेशा पहा
ऐसें जाणुनियां समस्त बुधहो
योजा उपाया महा ॥ ७ ॥

आर्या.

आर्यावर्तीं येउनि

हरिलें सर्वस्वि पूर्व वेदातें ।
ह्मणांनीं प्रार्थितसें
कीं आजी व्हा तुम्ही नवे दाते १
नानारूपें घेउनि
दाविति सर्वांस आज असुर हित ।
परि तें नव्हेचि हित कीं
करणारें या जगास असुरहित २

साक्या.

व्यापारास्त्रें शस्त्रें घेउनि
आपण विजयमुहूर्तीं ।
रणीं निघालों आतां जिंकुन
अरिस करूं परिपूर्ती ॥ १ ॥
हानिद परकी व्यापारासुर
घालूं धरातळास ।
जेणें लक्ष्मी हरुनी केलें
दीन अम्हां सकळांस ॥ २ ॥

अभंग २ चरणी.

हीच खरी दीपावळी ।

देशहितकारी मंडळी ॥ ध्रु. ॥
जमुनियां एका काळीं ।
एका स्थळीं एका ओळी ॥ १॥
स्वदेशाच्या हितसाधना ।
योजावया युक्ती नाना ॥ २ ॥
एकीं एकापुढें व्हावें ।
बंधुहित संपादावें ॥ ३ ॥
हाचि खेळ आह्मां गोड ।
नाहीं येराठायीं कोड ॥ ४ ॥
नको आह्मां सारीपट ।
ज्यांत बहु चाले कपट ॥ ५ ॥
आह्मी खेळूं बुद्धिबळें ।
सांडूं सारे अन्य चाळे ॥ ६ ॥
मित्र ह्मणे याच नादीं ।
करूं बुरजी मात प्यादी ॥७॥

आर्या.

खेळांत धूर्त लोकच
विविधद्यूतें सतांस तीं निंद्य ।

सत्पथाचि एक धरुनी
जें होइल लब्ध तें अह्मां वंद्य॥ १ ॥
पट चौसष्ट कळांचा
मांडुनि खेळूं विशाळ बुद्धिबळें ।
करुं प्यादि मात बुरजी
ताडुनियां डाव मिळुनियां सगळे॥२

साक्या.

मग आनंदें सकळहि न्हाऊं
जेवूं महोत्सवानें ।
करुं दीपोत्साहादिक होतां
प्राप्त सुदिन दैवानें ॥

दिंडी.

सदा चालो दिपवाळि हे अशीच ।
आर्यजनमन रंगलें राहु साच ॥
बिरिद देशप्रीतिचें मनीं ध्यानीं ।
सदा राखो जगदीश दयादानी॥१॥

श्लोक.

क्षीरसागरसमानमनांतें

वाहतों अजि तुम्हां सुमनांतें ।
प्रार्थितों मनिं धरा तुम्हि आर्य
सज्ज होउनि पहा निज कार्य ॥१॥

अभंग ४ चरणी

प्रेमाचिया बोलें न जावें कोपाशी ।
जें दिसे आह्मांशी तेंच बोलूं ॥ध्रु.॥
आह्मां हरिदासां आहे मोकळीक ।
म्हणून सकळीक क्षमा करा ॥१॥
नसे लोभ द्वेष भीड या अंतरीं ।
जैसें देव प्रेरी तैसें बोलूं ॥ २॥
हीच विनवणी मित्राची सर्वांस ।
अभयाची वास पाहतसें ॥३ ॥

दिंडी.

यथाकाळीं पर्जन्यवृष्टि होऊ ।
धरित्री जननी विपुल धान्य देऊ ॥
महीवर कोठें क्षोभ तिळ नसावा ।
जिवां होउ सदा शांति सुखविसावा १
सुनिर्धारें सप्रेमपूजनानें ।

आळवूं देवा भाविका मनानें ॥
प्रार्थना ही त्याचिया कानिं जावो ।
भक्तवत्सल सच्चिदानंद पावो ॥ २
भक्तवत्सल तूं प्रभो देवराया ।
पाव आलों अह्मि शरण तुझ्यापायां॥
नव्हे अमुच्या सत्प्रेमवैभवानें ।
तूंचि अपुल्या वात्सल्यगौरवानें ॥ ३

अभंग २ चरणी.

हेंचि दान देगा देवा ।
घडो भूमातेची सेवा ॥ ध्रु. ॥
देह लाविन तीच्या हिता ।
हीच माझी सायुज्यता ॥ १ ॥
कथिलें सकळ शास्त्रांहीं ।
मातेपरतें दैवत नाहीं ॥ २ ॥
मातृसेवा जगदीशाशी ।
असे मान्य निश्चयेंशी ॥ ३ ॥
मित्र विनवी कर जोडुनी ।
धरा भरंवसा हा मनीं ॥ ४ ॥

आरती.

जयदेव जयदेव जय परमानंदा ।
आरति कैशीकरूं तुज करुणाकंदा ध्रु.
जेथें अंतःकरणा प्रवेश मुळिं नाहीं ।
चारी वाणी मौनावल्या लवलाही ।
तेथें बाह्येंद्रियें करितिल हीं काई ।
यास्तव वृत्ती राहे अचलच निजठाईं १
अनाद्यनंता देवा निर्मल चिद्रूपा ।
निरवयवा निःसंगा निजबोधरूपा ।
राखिशि भक्तां शमवुनि त्रिविधाही
तापा ।
ज्ञानदीपें तुजला ओवाळूं बापा ॥ २ ॥
इच्छामात्रें सृष्टिस्थितिलय तूं करिशी ।
सर्वांतर्यामींचा चालक तूं असशी ।
न बोलवे कांहीं आम्हां बाळांशी ।
जाणुनि त्वद्गतदुःखें तारीं सर्वांशी ॥ ३

आळवूं देवा भाविका मनानें ॥
प्रार्थना ही त्याचिया कानिं जावो ।
भक्तवत्सल सच्चिदानंद पावो ॥ २
भक्तवत्सल तूं प्रभो देवराया ।
पाव आलों आह्मि शरण तुझ्यापायां॥
नव्हे अमुच्या सत्प्रेमवैभवानें ।
तूंचि अपुल्या वात्सल्यगौरवानें ॥ ३

अभंग २ चरणी.

हेंचि दान देगा देवा ।
घडो भूमातेची सेवा ॥ ध्रु. ॥
देह लाविन तीच्या हिता ।
हीच माझी सायुज्यता ॥ १ ॥
कथिलें सकळ शास्त्रांहीं ।
मातेपरतें दैवत नाहीं ॥ २ ॥
मातृसेवा जगदीशाशी ।
असे मान्य निश्चयेंशी ॥ ३ ॥
मित्र विनवी कर जोडुनी ।
धरा भरंवसा हा मनीं ॥ ४ ॥

आरती.

जयदेव जयदेव जय परमानंदा ।
आरति कैशीकरूं तुज करुणाकंदा ध्रु.
जेथें अंतःकरणा प्रवेश मुळिं नाहीं ।
चारी वाणी मौनावल्या लवलाही ।
तेथें बाह्येंद्रियें करितिल हीं काई ।
यास्तव वृत्ती राहे अचलच निज ठाईं १
अनाद्यनंता देवा निर्मल चिद्रूपा ।
निरवयवा निःसंगा निजबोधरूपा ।
राखिशि भक्तां शमवुनि त्रिविधाही
तापा ।
ज्ञानदीपें तुजला ओंवाळूं बापा ॥ २ ॥
इच्छामात्रें सृष्टिस्थितिलय तूं करिशी ।
सर्वांतर्यामींचा चालक तूं असशी ।
न बोलवे कांहीं आम्हां बाळांशी ।
जाणुनि त्वद्गतदुःखें तारीं सर्वांशी ॥ ३

अभंग २ चरणी.

पतिपुत्रांविण गति ।
नाहीं स्त्रियांशी जगतीं ॥ १ ॥
माझा अभिमान मनीं ।
तुह्मीं ठेवावा पुत्रांनीं ॥ ध्रु. ॥
पति भलत्या कामीं दंग ।
ह्मणुनि आला हा प्रसंग ॥ २ ॥
तुम्ही उदरींचे बाळ
असुनि मज हा दुःसहकाळ॥ ३ ॥
दाटे कंठ न बोलवे ।
परि वामनेत्र लवे ॥ ४ ॥
प्रार्थी मित्र कंबर बांधा
सुचिन्हाचा संधि साधा ॥ ५ ॥

श्लोक.

बसोनि एकत्र करा विचार
सोडा मनांतील हि सर्व चार ।
घेडल तेव्हांच परोपकार
मत्प्रार्थनेला आजि द्या रुकार १

पद.

( तें मन निष्ठुर कां केलें या चालीवर. )

काल पहा कैसा आला ।
स्वस्थ कसे बसलां ॥ ध्रु. ॥
पश्चिम दिशिं हा रवि उगवुनियां ।
अंबरिं कीं चढला ॥ काल० ॥ १ ॥
ओघ जलाचा उलटाचि चढे ।
हा शिलपाचा घाला ॥ काल० ॥ २ ॥
शुक्रकवीच्या शिलपकलांला ।
सर्वचि अंतरलां ॥ काल० ॥ ३ ॥
मयकृत अद्भुत रचना सभेची ।
विसरुनियां गेलां ॥ काल० ॥ ४ ॥
सदय प्रभूनें कांहिंच नाहीं ।
केलें न्यून तुह्मांला ॥ काल० ॥ ५ ॥
मित्र. वदे अतां प्रभुशि नमावें ।
तोचि हरिल या काला ॥ ६ ॥

श्लोक.

अगीवांचोनी बा

कड कधिं जला येतच नसे
तसें सत्य प्रेमा-
विण कधिं रुंडेंही नच दिसे ।
असें या देशाचें
हित कधिं न होईल समजा
न जों तुह्मी सारे
कळकळ धरा आणि उमजा ॥
न आर्यावर्ताची
धड गत अतां कांहिंच दिसे
वसेना पुत्रांच्या
मनिं जनकवात्सल्यहि तसें ।
जरी जागे झाले
तरि मिटुनि डोळे च निजती
अशा सुज्ञां लोकां
हरहर हका मारुं मि किती ॥

आर्या.

आर्यावर्तांतर्गत
दीनां मीनां तुह्मी च कासार ।

या यशसारक्षीरा
  लोटुनियां सेवितां च कां सार ॥

श्लोक.

मित्रबोल हे धरुनियां मनीं
  सद्विचार हा पसरुनी जनीं ।
एकता खरी करुनि सज्जनीं
  भोगिजे सुखा वरुनि मेदिनी ॥
भले बोला आतां
  नरवर तुह्मी चंद्रवदन
रमा मागेहीं कां
  सतत त्यजुनी आर्यसदन ।
अवज्ञा जी केली
  बहुविध तुह्मी ती न अवडे
ह्मणोनी गेली ती
  सहजच रहाया अइकडे ॥

साकया.

ईश्वरकृतिनें जें जें व्हावें
  तें तें उत्तम होतें ।

मानवकृतिच्या अपूर्णतेस्तव
तें परदेशीं जातें ॥ १ ॥
ज्यांच्या कौशल्याची कीर्ती
भुवनीं गाजत होती ।
सर्ववस्तुलाभार्थचि इतरां-
वर ते लोंबत रहाती ॥

आर्या.

व्यापार राज्य कर हे
भासति फांसे अभीष्टदानाचे ।
विश नृप जन हरति तिंहीं
त्यांसंमुख मा अभीष्टदा नाचे ॥१॥
व्यापार राज्य कर या
तीं फाशांनीं समस्त धन हरिलें ।
दुःख न धन नेल्याचें
त्यापरिसकलांतशस्त्र करिं धरिलें २

सवई.

वीर धनाविण पावतसे पद
श्रेष्ठ जनीं हरि रानिं जसे

संपदही असतां बहु संग्रहिं
क्लीब पराभव पावतसे ।
हेमनगीं जरि श्वा लवला तरि
थोरि नये हरिची कधिं त्या
तोचि मृगेंद्र वनीं बघतां मृग
संमुख होउनि वंदिति त्या ॥

आर्या.

चार चतुर नर बैसुनि
अक्षहृदय शास्त्र कायदे करिती।
दाविति जनांस सौष्टव
त्या अनुमति देति गौर एक रिती॥३

आर्या.

( उद्योगप्राधान्य. )

उद्योग निश्चयें कर
तो फलतो जेंवि ओतुला सत्य ।
जन्मापुनि गाय गृहीं
नाहीं परि दूध पीतसे नित्य॥ १॥
उद्योगें कार्य घडे

मनोरथी कोरडा जसाच तसा ।
नहि निजल्या सिंहाच्या
वदनिं शिरति पशु गुहेंत वात जसा॥२
साहस बुद्धि पराक्रम
धैर्य सुशक्ती तसाच उद्योग ।
जेथें सहा जमति हीं
तेथें हरि करि सुसाह्यतायोग ॥ ३ ॥
उद्योगिनरवराच्या
मागें धांवे सदा सुसंपत्ती ।
त्या सेवी प्रीतीनें
सकृपनृपा जशि सुनिश्चयी पत्ती॥४॥
उद्योग पंगु दैवचि
प्रधानसें बोलतात अविचारी ।
हा परिवादाचि मिथ्या
परदेशीं तूंच जाउनि विचारीं॥५॥
उद्योगिनरकराचा
आश्रय करिते सदा महालक्ष्मी ।
सालस नरकरिं राहे

दृढ आश्रय धरुनि ज्येष्ठ जी लक्ष्मी ६

साक्या.

स्वदेशीय मालाच्या विक्री-
साठीं एक दुकान ।
स्थापियलें त्याविषयिं विनंती
करितों द्यावा कान ॥ १ ॥
देशजननिच्या प्रेमें ज्यांनीं ।
आदरिली सुतरीती ।
ऐक्यविचारें अर्पिलि बुडत्या
व्यापारा सुतरी ती ॥
त्या बंधूंशीं सहाय व्हावें
भरतभूमिपुत्रांहीं ।
जर्जर होउनि शिल्पाश्रितजन
प्रार्थिति देवा त्राही ॥

आर्या.

हे आर्यतनयहो तुह्मि
द्या थोडें साह्य याच कामातें ।
देशाहितार्थच कथितों

न करा नैराश्य याचका मातें॥

श्लोक.

नव्हों अह्मी याचक आत्मकाजीं
असावि आह्मां मग लाज कां जी।
असों सदा मातृहितीं निबद्ध
पहा उभे घालुनि कास सिद्ध ॥

आर्या.

साधा बांधवहो हा
प्रसंग आणि झरझरा भरा भाग।
जरि न कराल जलदि अजि
करणें येईल जें पडे भाग ॥

श्लोक.

आरब्धकार्यास सहाय व्हावें
हें मागणें सज्जनिं ध्यानिं घ्यावें।
नाहीं विपन्नाशक अन्य कांहीं
व्यापार सोडून रमा न राही ॥

दिंडी.

भरतखंडामाजि हा भेद झाला,
नाशकारी अनुभाव पूर्ण आला।

बोलतांना हें दुःख अतिच वाटे,
अश्रु लोटुनि सद्गदित कंठ दाटे १
न वदवे कांहीं जें मनांत घाटे,
परी वेगानें ह्रदय फार फाटे ॥
अतां तरि याशी देउं या निरोप,
लावुं ऐक्याचें सर्व मिळुनि रोप २
सर्वभेदांचें विसरुं अतां मूळ,
माजलें हें ज्यापसुनि सर्व खूळ ।
एकमेकातें भेटुं कडकडून,
प्रेमसागरभरिं जाउं या बुडून॥३
ज्ञातिकर्मांचा भेद असो कांहीं,
देशकार्यामधिं तया स्थान नाहीं ।
अशी वृत्ति असो सर्वदा मनांची,
जिणें होईलकीं पूर्त्ति कामनांची ४

---

अभंग २ चरणी.

कोणी लोटा किंवा वारा ।
परि येऊं तुमच्या दारा ॥ ध्रु. ॥

आह्मी होऊनी गोसावी ।
फेरी करूं गांवोगांवीं ॥ १ ॥
ठाईं ठाईं हाका मारूं ।
निजालियां जागे करूं ॥ २ ॥
देशजननींचे बंदे ।
होउनि करूं हेचि धंदे ॥ ३ ॥
मित्र ह्मणे हा निर्धार ।
सिद्धिदाता जगदीश्वर ॥ ४ ॥

पद.

पुसा हें तुह्मि आपुल्या चित्तास ॥ध्रु.॥
उद्यमकरितां बाळकही ध्रुव ।
गेला अढळपदास ॥ १ ॥
अद्भुत यत्नें वळवि भगीरथ ।
गंगेच्या ओघास ॥ २ ॥
अठवुनि अशीं बहु साहसकृत्यें ।
घाला तुह्मि दृढ कास ॥ ३ ॥
वर्णांचे गुरु ब्राम्हण असतां ।
होतां कांहो दास ॥ ४ ॥

उद्यम सुरतरु दारीं असतां ।
काढा कांहो उपास ॥ ५ ॥
आर्यप्रभु कैवारी असतां ।
होतां कांहो उदास ॥ ६ ॥
मित्र वदे दृढनिश्चय ठेवा ।
यश देइल प्रभु खास ॥ ७ ॥

आर्या.

येतांच स्वल्प इंग्रजि
ज्ञानतमें पिउनियां सुरा माते ।
सेवी वारस्त्रीतें
जी करदा त्यजुनियां सुरामाते ॥१॥

श्लोक.

चित्तीं भ्रांती होतसे मद्यपानें
भ्रांती झाल्या पापकर्म क्रमानें ।
होतां पापें दुर्गती सत्य पावे
त्याच्या त्यागा नित्य नेमें जपावें॥

गीति.

मधुरहितं चेद्वक्त्रं

मधुरहितं भवति मानवस्य किल ।
तस्मिन्यस्य समधुता
प्रीतिस्तस्यापि समधुता भवति ॥

श्लोक.

पशुहुनि पशु होतो
मद्यपी घोरकर्मी
शरम न मनिं वाटे
बोलतां कांहिं वर्मीं ।
म्हणुनि इतर जंतू
मद्य कांहीं न पीती
भिउनि किं निजदेहीं
येउ ना रक्तपी ती ॥ ८ ॥

सुरागमादेव सुरागमानां
महीतलेऽस्मिन्प्रलयः प्रवृत्तः ।
अतः परित्यज्य सुरानुरागं
चिराच्चरित्रे कुरुतानुरागम् ॥

सवई.

होउनि मत्त मदें मदिरा पिइ

जो खल सर्व विनाश करी
पावुनि बुद्धिलयाप्रति सत्वर
त्यावरि येति तया लहरी ।
सर्वचि ओरड मार हणाहण
हें च अतां शहरोशहरीं
उत्तम वर्णिंहि येइल प्रत्यय
जाल जरी निशिच्या प्रहरीं ॥

श्लोक.

सज्जापि लज्जा वसनादिधृत्या
कृत्यात्तु तत्त्यागमुखाद्विनश्येत् ।
पश्येच्च सर्वो विहसन्हि लोकः
शोकोपरः को मधुपानतः स्यात् ॥

केका.

अकार्यकरणीं रते
नरपशू सुरा पीउनी
उतून मदमत्त तो
बरळतो वृथा कोपुनी ।
कुबुद्धि मनिं ये गणी

न जननी सखी कन्यका
अशा मनुजगर्दभा
सहज मारिती बायका ॥

श्लोक.

मद्यमद्य पिबन्सद्यो-
वद्यं हृद्याधिया जनः ।
विडादिमिश्रं वदने
पंकं धर्तुं न शंकते ॥
मद्यप्यास सत्य काय
चोरजारदोषमाय
त्यास भीति सर्व लोक
काय शोक करवि हा ।
आपलाच नाश हा
करी स्वतांच जाणुनी
तो कसा चुकेल अन्य-
लोकनाशसाधनीं ॥
जायबुद्धिकुसरी सुरा पितां

लोळतो महिवरी यथातथा ।
बोलतो अति विसंगतेंच हा
सन्निपातसमलक्षणें पहा ॥

पानेन प्रायशः पातः
प्रत्यक्षं प्रेक्ष्यते द्रुतम् ।
संभावनीयो नो कस्मा-
न्निपातः पारलौकिकः ॥

दिंडी.

असति जगिं पापें फार मोठमोटीं
परी सर्वांवर दारुचीच कोटी ।
इतर पापांच्या फळा भोगि काळें
दारु पीतां तत्क्षणीं पंकिं लोळे ॥

---

अभंग.

देह हा अर्पिला भूमातेच्या सेवे ।
प्रेरणाच देवें ऐशी केली ॥ ध्रु. ॥
हाका मारितांना कंठशोष झाला ।
कांहीं आर्द्र बोला बांधवांनो ॥१॥

तुह्मां सांगतसें तुमचेंचि हित ।
सावधान चित्त सारे करा ॥ २ ॥
नको आह्मां कांहीं शुष्क धन मान ।
स्वदेशाभिमान याचीतसों ॥ ३ ॥
नव्हों आह्मी येर याचकासारखे ।
द्रव्यास पारखें लेखूं सदा ॥ ४ ॥
मित्र ह्मणे दाता आह्मां सर्वेश्वर ।
येर ते पामर नर सारे ॥ ५ ॥

श्लोक.

निंदोत नीतिवदते अथवा स्तवोत
संपत्ति येउ अथवाहि सुखेंचि जाऊ।
आजींच येउ खलमृत्यु युगांतरीं वा
सन्मार्ग न त्यजति एकपदेंहि धीर॥

साकया.

प्रभा फाकली नभोमंडलीं
निजलां कांहो आतां ।
प्रवास दुरचा श्रम बहु तुह्मां
होतिल जातां जातां ॥

सुधारणेचा पंथ बिकट बहु
कंटक जागोजाग ।
लुटुनि फस्त ते करितिल तुह्मां
जरि ठेवाल न जाग ॥
अतिकष्टांनीं मिळवाल जरी
चाकरि यशा हुकाल ।
जलरेषेपरि जाइल चाकरि
राहिल यश बहुकाल ॥

श्लोक.

राष्ट्रें बहू जिंकिलिं पूर्वजांनीं
परी न तीं गांजिलिं लेश जांनीं ।
आर्यस्थली पश्चिमदेशजांनीं
केली जशी जर्जर अंत्यजांनीं ११

आर्या.

( स्वजन्मभूमिभक्ति. )

आर्यतनय विनवि जना
राखा अभिमान भूमिजननीचा ।
अजवर चुकलों यास्तव

गणिति अम्हां जेंवि गौरजननीचा॥
सीकंदर नरपतिचा
प्रातिनिधि लिहि भूपजनानिचीं न्यूनें।
भूप वदे तव पत्रें
वाहति मम मातृनेत्रबिंदूनें ॥

---

आर्या.

( कृतघ्न. )

श्वाना शोक करुं नको
प्राणिगणीं अधम जन्मलों म्हणुन।
आहे कृतघ्न अधमा-
धम ऊन तिळहि नसेच तुजहून॥ १ ॥
आकाशीं वास तसा
जलपृष्ठीं चित्रलेख वा मान।
स्नापन सलिलीं पवना
खलिं उपकारास हेंच उपमान॥ २॥

---

( लोभीराजा. )

जनधनलोलुप जो नृप

दुखवी काढुनि जनांस हिंस्त्रकरा।
तो द्विकर दिसे तरि त-
त्करसंख्या लाजवी सहस्त्रकरा ॥
रविकर दुःसह गमतां
रक्षिति जन निज तनूंस सुगृहांनीं ।
अथवा गिरिशिरिं जाउनि
नृपकर करिती कुठेहि जा हानी॥
महिलांचें प्रेम जसें
असतें निज तोकिं तेवि या महिचें ।
ह्मणुनि सुतलोभरहिता
जाति पतिशिं कल्पतुल्य याम हिचे
स्वोदरजांच्या नच जो
पाहे सुखदुःख कुशल आजारा।
त्या तोकप्रेमरहित
राजा भू गणि जशी शची जारा॥

---

श्लोक.

राज्ञी आंग्लरसानिवासि असुनी

विक्टोरिया सागरीं,
तैशी भूमिवरी समग्र दुरच्या
खंडींहि सत्ता धरी।
जीच्या ऐकुनि वैभवा नृपवधू
होती अति व्रीडित,
तीच्या या महिम्यास एक उपमा
शार्दूलविक्रीडित ॥
जिच्या सत्तायोगें
विपुलसुखसंपत्तितरुचें,
रुजे हें बीं येथें
अशि जननि कोणास न रुचे।
अतां या रोपांला
मधुर रस ती प्रेमळ सती
सदा देओ नाशो
अखिल कृमि जे त्यांस डसती ॥

आर्या.

व्हद्गत निजप्रजेचें

कळण्यास्तव वर्तमानपत्रास ।
स्वातंत्र्य देति त्यांच्या
मानुं अह्मी नित्य आतपत्रास ॥
आंग्लद्वीपीं राहुनि
चारी खंडीं करीं धरी दंड ।
ऐशा राज्ञीस प्रभु
देओ आरोग्य वैभव उदंड ॥

---

आर्या.

निजजनदारिद्र्याची
होळि करुनि व्हा समर्थ होळकर ।
एरविं दिसति चहुंकडे
तपस्यपुनवेस बाळ होळकर ॥
आलस्यविटपखांडव
जिंकुनि त्या उद्यमाग्नि लावाया ।
हे विजयि माधवासह
अन्यनृपाशा गमे मला वाया ॥

श्लोक.

यात्रायागादियोगा अणुनि नरपती
दूरदेशास जाती
तेथींच्या भिन्नलोकीं फिरुनि उमजती
काय सौख्यें इजा ती ।
राजे अन्यत्र देशीं स्वजनतनधना
रक्षिती काय रीती
हें शोधोनी मनीं ते जर हितकरसें
आढळे आदरीती ॥
ज्या पेशव्यांच्या दरबारिं यांच्या
अपूर्व ऐशा कृति पूर्वजांच्या ।
झाल्या न त्या वर्णवती कदाही
साक्षी तयां देति दिशाच दाही १

आर्या.

असतां असंख्य संनिध
वीर कृपापात्र हेच होळकर ।
केले ब्राह्मणपतिनीं

हे न कसे देति तत्प्रजेस कर ॥

श्लोक.

अहल्या हल्लींही
वसत असती भूवरि जरी
तरी ती धर्मातें
वळण दुसरें लाविति खरी ।
कलाविद्यांच्या ती
करिति बहु शाळा सुनगरीं
असो आतां देवो
मतिहि तुकयाला मलहरी ॥

---

श्रीमन्मंदिरवास खास कृशता
देतो असें पाहुनी
पावे खेद रमा प्रवास बरवा
वाटे तिला त्याहुनी ।
आर्यावर्त त्यजून यास्तवच ती
गेली असें जाणुनी
पेढ्या या नच आगमार्थ सतिच्या

डेरे दिले ताणुनी ॥

व्यापारवृद्धकुलकीर्तिनरासमान
नाहीं जनीं विपुल अन्य जनास मान
भूपालही सतत मानिति मित्र त्यांस
ऐसे न देतिल कसे कर बांधवांस ॥

आर्या.

वर्णुनि व्यापारस्थिति
रावविनायक गणेशतनयातें ।
जें युक्त तेंचि करण्या
प्रार्थि सनय पाहुनी शतनयांतें॥

---

कामाठीपुरवासि सुज्ञ जनहो
लावा ध्वजा याच कीं
एकीची तशि उद्यमाचि अणखी
द्या द्रव्य सद्याचकीं ॥
जे एकी करुनी जनीं वसति त्यां
होती क्रिया कामदा
भेदां वाढवुनी सुजाण वरिती

जाणों न या कां मदा ॥
कर्मीं शूर ह्मणोनि कर्मठ तुह्मी
नामानुसारी कृती
संपादूनि जगांत धन्यतम व्हा
प्रार्थी तुह्मां हें कृती ।
विद्यावृद्धि करावया कटितटी
बांधोनियां शोभलां
आतां पूर्ण समाप्त कार्य करुनी
ती सोडि जो तो भला ॥
कार्यारंभक शूर फार परि त्यां
कोणी न वाणा कदा
अर्धें टाकिति त्यांसही स्तवु नका
आरंभुनी एकदा ।
जे हातीं धरिलें समाप्त करिती
त्यांतें करा वंदन
व्हावें योगि भगीरथापरि तुह्मी
आर्यान्वयीं नंदन ॥

आर्या.

वेचुनि स्ववित्तपाला
दुर्गतिभीतास सुखविति वदान्य ।
ऐशा पुरुषा त्रिदशहि
वंदितिच भवौषधीश सन्मान्य ॥

श्लोक.

आर्यावर्तपिता समर्थ जननी
ही पुण्यभूमी मही
तुह्मी औरसपुत्र थोर दिसतां
मोठें तुह्मां नामही ।
झाले शूर अतीव थोर उदरीं
या दंपतीच्या किती
त्या सत्कुक्षिस आज लाज अणिली
धिक् धिक् अशा दुर्मती ॥

आर्या.

देशाटन बुधमैत्री
संहतिसंचार नृपसभागमन ।

बहुशास्त्रार्थविलोकन
पांचांनीं फार चतुर होय मन ॥

श्लोक.

ज्ञानतिक्त गमतें प्रथमक्षणीं
पारिभद्रदल जेविंहि भक्षणीं ।
नाशि सर्व विपदा परिणामिं तें
संपदा यश सुखादि समर्पितें ॥
जिल्ह्यांच्या ज्या प्रतिनिधि सभा
जाहल्या त्यांत आदी
ठाण्यामाजी प्रथमच सभा
जाहली तीच नांदी ।
ज्याच्या यत्नें जनि हिचि तया
नाम गोविंद साजे
संसद्योगें सकळहि जळो
हिंदुची औदसा जे ॥

आर्या.

हा अरुणोदय नव्हे

प्राग्दिग्वधु लालशालुनें फडके ।
तत्प्रेमें सूर्योदय
होतां रज यावया पुढें दबके ॥१॥
लोकहितावह कृत्यें
बहुशा येथें समस्त वसतात ।
यास्तव वसई पुरिचा
ऐकूं येतो सम स्तव सतांत ॥
सांप्रत शहरोशहरीं
लाविति मन जनहितार्थच वकील ।
भारतहितशत्रूंच्या
ह्मणुनि मनीं रुतति जेंवि नव कील ॥
न्यायाधीशापुढती
परदुःखनिवारणार्थ झगडावें ।
हेंच बिरिद वकिलांचें
राखा हें ह्मणुनि आर्यजग डावें ॥

श्लोक.

युद्धीं बुद्धि विशाल तीव्र ह्रदयीं

ज्या स्वामिनिष्ठा पुरी
शांतीनें निजबंधुमृत्युजनिता
टाकोनि खेदा दुरी ।
सोडा भ्रातृसुता असा बहु वृथा
स्वामी जयें प्रार्थिला
तो श्रीमद्यशवंतराव विलसे
राखी सदा आर्थिला ॥
शिंद्याची पृतना विशाल सजली
संग्राम साधावया
स्वामी त्या निजसाह्य दे परि रणीं
तो भी बहू यावया ।
झाला पूर्ण यशस्वि होळकर हें
ऐकोनि भांबावला
साक्षान्मानवसिंह टाकुनि वृष-
त्सिंहाकडे धांवला ॥
वाढवोनि विषवृक्षही स्वतां
कापणें अतिविरुद्ध सर्वथा ।

लावुनी अमरवृक्ष कापवी
तो स्वतांस जनतेस ताप वी ॥
तर्वारिचे वार शिरीं वहाती
अंगावरी भल्लजघाय होती ।
त्यांतेंहि कांहीं न जुमानिती जे
ते सत्य जाणा यशवंत राजे ॥
तुकोजीराजाचा
जय भरतखंडीं चिर असो
तयाच्या भांडारीं
उदधितनया नित्य विलसो ।
प्रजा या भूपाची
जनहितिं असो तत्पर सदा
जिच्या योगें होऊ
भरतजननी सत्वरसदा ॥
गीर्वाणवाणीकुशला नृपाला
वाटेल हें भाषण शुष्कपाला ।
सदाश्रमीं सेविति देव पाला

त्यजूनियां यागगतां वपांला ॥
अर्पूं अह्मी हाच तयास भावें
स्वीकारु तो तो जलदस्वभावें ।
आकर्षि तो क्षार मचूळ वारी
करी अतिस्वच्छ मधूर भारी ॥

दिंडी.

पुण्यपुरुषापासून पुण्यधामीं
लागला हा कल्पद्रु पुण्यकामीं ।
फलें पुष्पें जन त्याचिं मालवांत
घेति त्या न इजा देउ तीव्रवात ॥

आर्या.

ज्या धामिं निजकुलोदय
झाला तेथें सुकीर्ति चिर पसरो ।
स्थापून शिल्पशाळा
लोकांचा तीव्र दैन्यताप सरो ॥

श्लोक.

एका मुळापासुन वर्ण एक
झाला पुढें कार्यवशें अनेक ।

ते जाहले हाच खरा विचार
जे वाणिती येर असे असार ॥
आधीं धनी सेवक दोन भेद
आद्यांतही होति पुन्हा त्रिभेद ।
ज्या ब्राह्मण क्षत्रिय वैश्य नामें
क्रमें दिलीं लक्षुनि त्यांचिं कर्मैं ॥

आर्या.

सप्तर्षिनगरवासी
भट्टकुलोत्पन्न काश्यपसगोत्र ।
सुत परशुरामकविचा
विष्णु वदे प्रार्थुनी सुरस गोत्र ॥ १ ॥
सत्राशें पंचाण्णव
सालींही शालिवाहनशकाच्या ।
ओंविलि माळ फुलांची
शोभो कंठीं स्वदेशभजकाच्या ॥

समाप्त.

विनायक यशवंत बेडे यांची कविता.

पद.

निराकारनिर्गुणाअनंता। निरा०ध्रु०
अंत न लागे तुझ्या गुणांचा।
श्रमल्या दशशतफणा ॥ अनं०॥१
मंत्र तंत्र झट तुजवांचुनियां।
खोटें वाटो मना। अनं० ॥ २ ॥
स्तविती त्यांला पावसि देवा।
सुख दे तव परिजना॥ अनंता०॥३॥

---

बुधजन चित्त स्थीर करा ॥बु०॥ध्रु०
अनन्य होउनी जगदीशाला।
जोडा आधिं करा॥ बु० ॥ १ ॥
परउपकारा मागें न होऊं।
निश्चय हाचि करा॥ बुधज० ॥ २ ॥
मत्सर सोडुनी उद्योगातें।
हातीं आधिं धरा॥ बुधजन० ॥ ३

भीतां भीतां सर्वहि गेलें ।
जाणुनि धैर्य वरा ॥ बुधजन० ॥४॥
स्वस्थ बसुनियां बहु सुख भोगूं ।
हेंचि अतां विसरा॥बुधजन० ॥ ५॥
प्रभुच्या नांवा घेउनियां मग ।
दुःखाब्धी उतरा ॥ बुधजन०॥ ६ ॥

दिंडी.

अमित संपत्ती सर्व पहा गेली,
नाहिं आतां कांहींच राहियेली ।
आळसानें दुर्दशा जी हि केली,
प्रभूवांचुनि संकटीं कोण वाली १

आर्या.

दुर्गतिदारिद्रदाता
यशहर्ता हरिल आयु आळस कीं ।
नाशिल राहुनि देहीं
ज्ञानेंद्रियमुख्य इंद्रियें असकीं ॥ १ ॥

श्लोक.

भक्तपालका बुद्धिदायका

मुक्तिदायका कीर्तिदायका ।
पाव पाव रे हे सनातना
धैर्य देइंजे आमुच्या मना ॥ १ ॥
बाप तूंच रे आइ तूंच रे
बंधु तूंच रे आप्त तूंच रे ।
रक्ष रक्ष तूं ह्या तुझ्या जनां
धैर्य देइंजे बोधितां मना ॥ २ ॥
प्रार्थुनी तुला बुद्धि मागती
सत्य मधुर जे बोल बोलती ।
चांगल्या सवें नित्य चालती
ते महीवरी कीर्ति पावती ॥ ३ ॥
वक्ता शास्त्रज्ञ नाहीं
करुनि कधिं कथा
पाहिली हेंहि नाहीं,
बोलाया येत नाहीं
परि वदति मुलें
बोबडें तेंवि कांहीं ।

गाऊनी रंजवावें
परि खचित मला
सूर ठाऊक नाहीं,
सांगाया ठायिं ठायीं
चुकि पडलि तरी
सांवरावी बुधांहीं ॥ ४ ॥

आर्या.

हरिदासांनीं केल्या
करिति कथा त्यांस योग्य हो करणें।
शास्त्रज्ञ तेंहि करिती
आह्मी शिकवूं करूं उदाहरणें ॥१॥
श्रोत्यांचें मन वेधी
स्पष्ट वदे धैर्य धरुनि अस्खलित ।
वक्ता त्यास म्हणावें
उपदेशें साधि कार्य जो त्वरित ॥ २
गद्योपदेश करिती
बोधिति सकळांस जोडुनी पाणी ।

त्यापरिस कीर्तनानें
येतें नयनांत वाहतें पाणी ॥ ३ ॥

श्लोक.

धैर्यं यस्य पिता क्षमा च जननी
शांतिश्चिरं गेहिनी
सत्यं सूनुरयं दया च भगिनी
भ्राता मनःसंयमः ।
शय्या भूमितलं दिशोऽपि वसनं
ज्ञानामृतं भोजनं
एते यस्य कुटुंबिनो वद सखे
कस्माद्भयं योगिनः ॥ १ ॥

आर्या.

ही मणिहेमालंकृत
होती भू तीस जाहली कुदशा ।
यवनांनीं इतरांनीं
लाविय़ल्या बुध पहा तियेशि कशा १
पिकविति आर्यावर्तीं

कष्ट करुनि बहुत लोक कापूसा ।
मांचेस्टरिं कां नेतां
प्रश्न करा हा भिऊं नका पूसा ॥ २ ॥
शिरतां भुजंग सदनीं
प्राण जनाचा कधीं न वांचेल ।
सच्छिद्र पात्र असतां
उदक कसें त्यांत सांग सांचेल ॥ ३
कर कर जोडुनि देती
परि मानिति मानसांत खेदास ।
सोडुनि व्यापारांतें
आळसरिपुचेचि जाहले दास ॥ ४ ॥

पद.

व्यापाऱ्यांची गति कशी झालि
हो ॥ व्या० ॥ ध्रु० ॥
जिन्नस जैसा न मिळेहि पैसा ।
अशि त्यांवरी वेळ
आलि हो ॥ व्या० ॥ १ ॥

लावुनि दारें स्त्रीसह पोरें ।
अन्नअन्न करुनि पहा
मेलिं हो ॥ व्या० ॥ २ ॥
संकटहर्ता प्रभुवांचुनियां ।
आहे जना कोण अतां
वालि हो ॥ व्या० ॥ ३ ॥

पद.

पूर्वी पेंढारी होते चोर
धन नेलें फार ।
लुटिलें यवनांनीं दिधला मार
झालों लाचार ।
आतां योजा हो कांहिं विचार
मागों या वर ।
व्यापारीं लागो लक्ष आमुचें
देवा संकट हर या लोकांचें ।
गाती यश साचें ॥ १ ॥
ऐका बाहेरची वस्ती खोटी

भीतिप्रद मोठी ।
हरकावर्यांची न मिळे रोटी
नेसति लंगोटी ।
मजुरी करती हो पोटासाटीं
धन न पडे दृष्टी ।
कांदे करंदे अन्न तयांचें
देवा संकट हर या लोकांचें ।
गाती यश साचें ॥ २ ॥

कुणबी श्रम करती शेतावरती
पूर्वीची धरती ।
माती घालुनियां दगडावरती
धान्यें पेरीती ।
कांहीं त्यांतुनियां चोर नेती
बहु कष्टी होती ।
बाकी पिकलें धान्य धन्याचें
देवा संकट हर या लोकांचें ।
गाती यश साचें ॥ ३ ॥

द्वेष मत्सरही काढुनि टांका
बुध मारिति हांका ।
अळसाअहिला तुह्मि मारुनि टांका
भय हा नरभेका ।
कोणी दारूला सेवूं नका
गांजाही टांका ।
वदलों दुःख मि ह्या देशाचें
देवा संकट हर या लोकांचें ।
गाती यश साचें ॥ ८ ॥

आर्या.

धन असतां कर द्याया
येतें तुमच्याचि वारि नेत्रास ।
निष्कांचन कर होतां
सोसाल पुढें कसा करत्रास ॥ १ ॥
सोडा आळस आधीं
जोडा व्यापार एकि करवा हो ।
त्वरित विचार करा हो

स्वदेशसुखवर्धनास करवा हो २

साक्या.

सुया टांचण्या चाकु कातऱ्या,
नौका भरोनि येती ।
सुवर्ण रत्नें गोळा करुनी,
अन्यद्वीपीं नेती ॥ १ ॥
तऱ्हेतऱ्हेचीं चित्रें करुनी,
आणिति कांच विकाया ।
हिरे नेउनी गारा दिधल्या,
हाच भिकेचा पाया ॥ २ ॥

श्लोक.

स्वदेशजननीस सौ-
ख्यद उपाय योजा बरा,
जनांस उपदेशुनी
प्रथम आधिं एकी करा ।
तुम्हांस अवघे पहा
लुटति येउनी या घरा,

म्हणोनि कर जोडितों

भिउं नकाचि धैर्या धरा ॥ १ ॥

पद.

आर्यावर्ता जनका तुजला,
यवनीं बहु गांजिलें,
कशानें आतांही बांधिलें ॥ ध्रु० ॥
सर्वसुखांनीं सुखी तुला बा,
पृथ्वीवर मानिती,
म्हणोनी सर्व तुला लूटती ।
नानायत्नें हरुनि संपदा,
दीन केलि संतती,
अतां तुज व्हावें लागे यती ।
व्याख्यानानें कीर्तन करुनी,
पुत्र तुझे बाहती,
तयांच्या विचार मनिं घोळती ॥

चाल.

अतां करावें काय कसें हो पुढें ।

पडलीं कांहो सर्वांला हीं गुढें ।
बोला आतां सांगावें काय मुढें ॥
उठा उठा हो त्वरा करा हो,
अळसानें जिंकिलें,
म्हणोनी दैन्यानें घेरिलें॥आर्या० १
आर्यावर्तें माते त्रासूं,
नको पदीं लागतों,
जोडुनी करा तुला सांगतों।
सेवा कांहीं न घडे तूझी,
क्षमा सकळ मागतों,
वदाया वर्तमान लाजतों।
धंद्याकरितां तुझिंगे बाळें,
देशोदेशिं भटकतों,
हलांमधिं काळ असा लोटितों ॥

चाल.

व्यापाऱ्यांचीं दारें बंद जाहलीं ।
कारागिरांनीं कामेंही ठेविलीं ।

कुलुपें हातीं घरास कीं लाविलीं ।
घातक आळसरिपुनें त्यांला,
थोपटूनि निजविलें ,
म्हणोनी दैन्यानें घेरिलें॥ आर्या ० २

आर्या.

पूजासुवर्णपात्रें
गेलीं हो ही विलायती करणी ।
आर्यावर्ती आतां
कांचेचीं झालिं सर्व उपकरणीं ॥ १ ॥

साक्या.

देशी कपडे विकावयाला,
घालिति एक दुकान ।
त्याला तुम्ही साह्य करा हो,
कृत्य नवें हें सान ॥ १ ॥
प्रभुला गाहो यत्न करा हो,
आळस हा दवडा हो ।
धैर्य धरा हो एकि करा हो,

व्यापारीं कर वाहो ॥ २ ॥
व्यापाऱ्यांचीं दारें उघडा,
लावा उद्योगाला ।
त्वरित उठा हो भिऊं नका हो,
आळस बागुल याला ॥ ३ ॥
आळसरिपु तो तुम्हां भेंववी,
घेउनियां सोंगाला ।
त्याची दृष्टि न पडो यास्तव,
तीट लावितों गाला ॥ ४ ॥

आर्या.

आर्यावर्तपित्याला
सुख व्हाया त्वरित लंडनीं जाल ।
आणाल युक्ति तेथिल
तरि सुत हो भरतखंडिं गाजाल ॥ १
एकी होउनि एथें
करिती व्यापार जेधवां सर्व ।
आर्यावर्ती तेव्हां

गाइल कवि सुखद तें महापर्व ॥ २

पद.

विद्या प्राणाचाही प्राण ॥ वि० ध्रु०
भार न देतां शोभवि देहा,
देइ सदा सन्मान ॥ विद्या० ॥१॥
संकटसमयीं धांवत येई,
विद्या बंधुसमान ॥ विद्या० ॥ २ ॥
प्राप्त कराया फार झटावें,
आहे जों वय सान ॥ विद्या० ॥३॥
सर्व सुखास्तव मिळवावें हें,
सद्विद्याधन जाण ॥ विद्या० ॥ ४ ॥

अभंग.

विद्या देईल संपदा ।
हरुनि नेईल आपदा ॥ १ ॥

ओंवी.

विद्यानेत्र परमपवित्र ।
भासे त्याचा व्यापार विचित्र ।

द्वीपांतरींचेंही चरित्र ।
ज्या नेत्रें अवलोकिजेतें ॥ १ ॥

अभंग.

विद्या भासे मज प्राणाचाही प्राण ।
प्राणाचें रक्षण जीणें होय ॥१॥
ज्यास नाहीं मान तो प्रेतासमान ।
आहे तोही मान विद्येहातीं ॥२॥
विद्येच्यानि योगें देव आकळतो ।
स्वर्गीचा कळतो वृत्तांतही ॥३॥
जन्मा येउनीयां विद्येला सेवावें ।
सार्थक करावें ह्या जन्माचें ॥४॥

श्लोक.

देह शोभवी हेमभूषणें
देति सज्जनीं त्यास दूषणें ।
शोभवील जो देह सद्गुणें
त्यास नाहिं या भूवरी उणें ॥१॥
वाणी रसवती यस्य

भार्या पुत्रवती सती ।
लक्ष्मीर्दानवती यस्य
सफलं तस्य जीवितम् ॥ २ ॥
सत्यासत्यविचारसिंधु तरि हा
मोठा असे आठवा
आनंदेंचि कथामृतासि जन या
बाळांसही पाठवा ।
आधीं यत्न करोनियां सुजन हो
विद्याधना सांठवा
जो दाता सुख वर्णितांचि सुमनें
त्या ईश्वरा आठवा ॥ ३ ॥

पद.

प्राण्या सत्य सदां
तूं बोल ॥ प्राण्या० ॥ ध्रु० ॥
शास्त्रें पाहूं जातां तुजला ।
असती भारी खोल ॥प्राण्या०॥१॥
सत्यामृत जरि निशिदिनिं घेसी ।

नाहीं तरि त्या मोल ॥ प्रा० ॥ २॥
सत्कीर्तीचा इहपरलोकीं ।
वाजों द्यावा ढोल ॥ प्रा० ॥ ३ ॥
देशहितेच्छु प्रार्थुनि सांगे ।
मानुं नये हें पोल ॥ प्रा० ॥ ३ ॥

अभंग.

देह जावो अथवा राहो ।
सत्यवचन सिद्धी जावो ॥ १ ॥
सर्व सुखांचा सागर ।
जनावरी उपकार ॥ २ ॥
तरी उपाय करावा ।
हाची मार्ग स्वीकारावा ॥ ३ ॥

साकया.

आर्यावर्तीं उद्यम नाहीं,
लोक भिकारी झाले ।
उद्योगानें द्वीपांतरिचे,
जन धनधान्यें धाले ॥ १ ॥

उद्योगास्त्रें शस्त्रें घेउनि,
  आळसरिपु जिंकावा ।
मोठा कपटी देह नाशितो,
  दुष्ट जयाचा कावा ॥ २ ॥

अभंग.

सर्व सूख आहे उद्योग्याचे घरीं ।
  पावे याची सरी कामधेनू ॥ १ ॥
ज्ञान आधीं शिका करा मग धंदा ।
  पाहोनियां आदा खर्च करा ॥ २ ॥
चाकरीची आशा सोडोनियां द्याहो ।
  व्यर्थ देह कांहो कष्टवीतां ॥ ३ ॥
मंत्र तंत्र सोडा यंत्रें सर्व जोडा ।
  देंती साधु धडा पाठ करा ॥ ४ ॥
विष्णुपंत यांणीं केली आगपेटी ।
  कीर्ति झालि मोटी लोकांमाजी ॥ ५
सुताचें तें यंत्र मोरोबांनीं केलें ।
  तयांस वरिलें कीर्तीनें हो ॥ ६ ॥

सुरस कीर्तन केलें पंडितांनीं ।
थोरसानीं ज्याणीं कीर्ति केली ॥ ७
जोडोनियां हात सांगतों बुधांस ।
करा उद्योगास आधीं आधीं ॥८॥

आरती.

जय माते जय माते जय आर्यावर्ते ।
बहुरोगांनीं आलें वृद्धत्व माते॥ज० ध्रु.
कैसें छळिलें छळती रोग तुज आतां ।
कथिलें सर्वांला मी कीर्तन करितां ॥
निर्धन झालिस माते यवनांनीं लुटतां।
तारिल प्रभु तुज आतां
संकटीं बुडतां ॥ ज० ॥ १ ॥
कर कर जोडुनि देती होतो बहुत्रास।
आळस सोडुनि करती जरि
उद्योगास ॥
सुख होइल तुजला तूझ्या पुत्रांस ।
आरतिछंदानें मी वदलों मित्रांस ज०

आळस मोठा आहे सर्वांचा वैरी ।
उद्योगास्त्रें शस्त्रें जो त्याला मारी ॥
सदैव नर तो भोगी संपत्ती सारी ।
दुःख तयाचें अंगें प्रभु येउनि
वारी ॥ ज० ॥ ३ ॥

समाप्त